**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/३९/२०२३

दिनांक -२८.०३.२०२५

**प्रति,**

१. चॉदबी मकबुल वेळापूरे

२. ऐजाज मकबुल वेळापूरे

३. आप्पासाब मकबुल वेळापूरे

अपिलार्थी ०२ व ०३ ची अ.पा.क अपिलार्थी ०१

सर्व रा. अंकलगी, ता.जत, जि.सांगली

सध्या रा.सिध्दापूर ता.मंगळवेढा जि.सोलापूर .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. शमशाद मकबुल वेळापूरे

रा. अंकलगी ता.जत जि.सोलापूर .... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाचा फेरफार |
|---|---|---|---|---|---|
| अंकलगी | जत | २५७ | २० हे. ०१ आर., | ०० हे.६३ आर. | ६०२० |

मौजे अंकलगी, ता. जत जि. सांगली येथील वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, संख यांनी फेरफार नंबर ६०२० मंजूर करणेच्या निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थी यांनी अपील दाखल केलेले आहे.

प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.

**अपिलार्थी यांनी आपले लेखी युक्तीवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकत ही अपेलंट नं.१ चे पती व नं.२ व ३ चे वडील कै.मकबुल आप्पासाब वेळापुरे यांचे नांवे होते. ती त्यांची वाडवडीलार्जीत मिळकत आहे. त्यांचा विवाह अपेलंट नं १ यांचेशी रितसरपणे झालेला असून त्यांचे विवाह बंधनातुन अपेलंट नं २ व ३ ही अपत्ये झाली आहेत. कै.मकबुल आप्पासाब वेळापुरे हे दि.३०/१२/२०२० रोजी मोजे अंकलगी गावी मयत झाले असून त्यांना अपेलंट हेच रितसर व कायदेशिर वारस आहेत.

२. त्याप्रमाणे त्यांनी गा.का.तलाठी अंकलगी यांचे दि.२२/०२/२०२१ रोजी वारसा करीता रिसर अर्ज केला. त्या अर्जाची चौकशी झाली व तो अर्ज बरोबर असल्याने मंजूर होऊन फे.नं. ५८१८ प्रमाणे दि. २१/०३/२०२१ रोजी अपेलंट यांच्या नावाची नोंद ही वारस ठराव क्र. ४५८ ने मंजूर झाली. व रितसर अपेलंट यांच्या नावाची नोंद ७/१२ वर आली. व त्याप्रमाणे अपेलंट हे आजही सदर जमिन कसून वहिवाटून खात आहेत.

३. सदरील जाबदार या तिन्हाईत स्त्रीचा अपेलंट वा मयत कै.मकबुल आप्पासाब वेळापुरे यांच्याशी काडीमात्र संबध नसतना तिला अपेलंट यांनी कधीही पाहिलेले नसताना तिने दि. ०५/१२/२०२१ रोजी गावातील श्री.शेख सर व सोमनाथ चंद्राम मेत्री व त्यांचा भाऊ विश्वनाथ चंद्राम मेत्री यांचेशी व सरपंच श्री परमेश्वर बिरादार यांचेशी संगनमत करून कै.मकबुल

आप्पासाब वेळापुरे यांचे वारस आहेत. म्हणून गा.का.तलाठी **अंकलगी** यांचेकडे बनावट अर्ज करून खोटा प्रतिज्ञालेख, खोटा पंचनामा करून दिला व त्या **आधारावरून** अपेलंटचे अपरोक्ष बेकायदेशिरपणे पुन्हा फे.नं.६०२० करण्यात आला. व तो **मंडळ** अधिकारी संख यांनी दि. ०४/०१/२०२२ रोजी बेकायदेशिरपणे मंजूर केला आहे.

४. फे.नं. ६०२० अपेलंट यांचे फे.नं.५८१८ प्रमाणे मयत **कै.मकबुल** आप्पासाब वेळापुरे यांचे वारस चौकशी होऊन पूर्वी नोंद झालेली आहे. ती नोंद न पाहताच फे.नं ६०२० जो मंजूर केला तो रदद करण्यात यावा. मंडळ अधिकारी संख यांनी फे.नं.६०२० ची नोंद मंजूर करताना अपेलंट यांना कोणत्याहीं प्रकारची नोटीस न देता जो जो आदेश केला आहे तो चुकीचा व बेकायेशिर आहे.

५. मंडळ अधिकारीसो संख यांनी फे.नं. ६०२० ची नोंद मंजूर करताना स्थानिक चौकशी करून पूर्वी फे.नं. ५८१८ मंजूर झाला आहे. याबाबत कोणतीही चौकशी न करता आदेश केला आहे तो चुकीचा आहे.सदर जाबदार यांच्या अर्जात ज्या मयताचे बाबत वारस मागितले आहेत त्याबाबत पूर्वीचा अपेलंट यांचा फे.नं. ५८१८ हा मंजूर झाला आहे हे ७/१२ वरून स्पष्ट होत असतानाही या अपेलंट यांना नोटीस काढून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न देता बेकायदेशिर पणे फे.नं. ६०२० मंजूर केला आहे तो चुकीचा व तो रदद होणे गरजेचे आहे.

६. मंडळ अधिकारी संख यांनी फे.नं. ६०२० ची नोंद मंजूर करताना मे. महसुल कायदाप्रमाणे एकदा वारसाचा फेरफार मजूर झालेनंतर पुन्हा अर्ज आलेस त्याबाबत पुन्हा निर्णय देण्याचा अधिकार त्यांना नसतानाही मंडळ अधिकारी संख यांनी त्याकडे दुर्लक्षीत करून जो आदेश केला आहे तो चुकीचा व बेकायेशिर आहे.

**जाबदार यांनी आपले लेखी युक्तीवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. अपेलंट यांचे अपिलातील सर्व मजकुर खोटा व लबाडीचे असून जाबदार यांना मान्य व कबुल नाही. जाबदार यांना अपिलातील ज्या कथनांचा स्पष्ट इन्कार केले नाही ते जाबदार मान्य केले आहे असे न समजता त्याची शाबीत करणेची जबाबदारी अपेलंट यांचे वर राहील .

२. अपेलंट यांचे अपीलातील पॅरा कलम २ मधील सर्व मजकुर खोटा व लबाडीचे असून या जाबदार यांना मान्य व कबुल नाही. मडळ अधिकारी यांनी सर्व पुरावा व कागद पत्रे बघुनच फेरफारला नोंद केली आहे.

३. जाबदार व मयत मकबुल आप्पासाहेब येळापुरे यांचे विवाह दिनांक ०५/०४/१९९९ रोजी माडग्याळ येथे मोदीनसो बापुसो नदाफ रा. सोन्याळ ता. जत या काजीने केले आहे. त्याचे नोंद सोन्याळ येथील मशिदीतील निकाह की दप्तर पेज नं ८ ला नोंद आहे तसेच मकबुल येळापुरे यांचे एकत्र कुटुंबातील रेशनकार्डला देखील १९९९ पासुन नोंद आहे. आता नवीन रेशनकार्ड मध्ये भाऊ बशीर आप्पासाहेब येळापुरे या दोघांचे नांव नोंद आहे. तसेच १९९९ मधील लग्नातील फोटो देखील अहे अशी वस्तुस्थिती असताना अपेलंट यांनी जाबदार यांचे हिस्सा हडप करणेची उद्देशाने तीला काही कल्पना न देता तसेच कोणतेही नोटीस न देता तीचा नांव वारस करताना खोटी ॲफिडेव्हीट घालुन वगळले आहे. उलट अपेलंट यांचेच लग्नाबाबत कोणताही पुरावा दिसून येत नाही जाबदार ही मयत मकबुल आप्पासाहेब येळापुरे यांचे कायदेशीर पत्नी असून मंडळ अधिकारी संख यांनी मंजुर केलेली फेरफार नं ६०२० बाबत केलेला आदेश योग्य व बरोबर आहे.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, जाबदार यांचा युक्तिवाद, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे याचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे अंकलगी, ता. जत जि. सांगली येथील वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, संख यांनी फेरफार नंबर ६०२० मंजूर करणेच्या निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थी यांनी अपील दाखल केलेले आहे.

२. प्रकरणातील पुराव्याचे कागदपत्राचे अवलोकन करता फेरफार क्र.६०२० ने जाबदार यांची वाद मिळकतीचे सदरील मयत खातेदार मकबूल आप्पासाब वेळापूरे यांचे वारस म्हणून अपिलाथी यांचेसोबत नोंद झालेचे दिसून येत आहे. तथापि याच मिळकतीसंदर्भातील फेरफार क्र.५८१८ अन्वये फक्त अपिलार्थी यांची मयत खातेदार मकबूल वेळापूरे यांचे वारस म्हणून नोंद झालेचे दिसून येते.

३. उक्त दोन्ही वारस फेरफार ज्या वारस ठरावाच्या आधारे झाले तो वारस ठराव क्र.४५८ हा एकच आहे. एकच वारस ठरावाचे आधारे दोन वारसा फेरफाराच्या नोंदी मंजूर करणेचे कोणतेही संयुक्तिक कारण या न्यायालयासमोर आलेले नाही. त्यामुळे वारस ठरावाचे आधारे प्रथम फेरफार मंजूर असतांना त्याच वारस ठरावामध्ये जाबदार यांचे नाव समाविष्ट करून दूसरा फेरफार धरून घेणेची ग्राम महसूली अधिकारी यांची व मंडळ अधिकारी यांची कृती कायदेशीर ठरत नाही.

४. वास्तविक प्रकरणी उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन करता, जाबदार ही मयत खातेदार यांची पत्नी असलेचे दिसून येत आहे. सबब सदर गट नंबर २५७ मधील मयत खातेदार यांची वारसा नोंद करणेची प्रक्रीया दोन्ही वारसा फेरफार क्र.५८१८ व ६०२० चे नोंद वेळी सदोष असलेचे सिध्द होत आहे. त्यामुळे दोन्ही फेरफार क्र ५८१८ व ६०२० रद्द करणे उचित व कायदेशीर होणार आहे. मयत खातेदारांच्या वारसांची फेरचौकशी करून नोंद घेणे योग्य राहील असे माझे मत झालेले आहे. सबब मी,अजयकुमार, उपविभागीय अधिकारी जत पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येते व मौजे अंकलगी ता.जत जि.सांगली येथील वारसा फेरफार क्रमांक ५८१८ व ६०२० रद्द करण्यात येत आहेत. यापुढे असाही आदेश देण्यात येतो की, प्रकरणी फेरवारसाकामी अर्ज प्राप्त झालेनंतर ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी स्थानिक चौकशी करून मयतांचे सर्व वारसांच्या नोंदी कामी फेर वारस नोंद घ्यावी.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर आदेशाची अंमलबजावणी अपील मुदतीनंतर करण्यात यावी.

सदर निकालाची समज सर्व संबंधितांना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पाहणेस उपलब्ध आहे.

ठिकाण - जत
दिनांक -२८.०३.२०२५

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

उप विभागीय अधिकारी * जत उपविभाग, जत *

प्रत- अपर तहसिलदार,संख यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.